मा. प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:११/०४/२०२५

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**दाखल कार्यपत्रिका**

विषय क्र.३६त्वर्य

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ramesh Annasaheb Deshmukh यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७६१४५५/- पेक्षा ३५.६७०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३४९६४४/- अधिक जीएसटी र.रु.७८२९३६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१४५९२/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५१४७१७२/- पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२९, दि.०८/०४/२०२५ चे पत्र.

विषय क्र.३७त्वर्य

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२४- २५ या वर्षातील संचलन तुटीपोटी मागणी करण्यात आलेली पुणे महानगरपालिकेच्या हिश्श्याची (६०%) रक्कम सन २०२५ - २६ या आर्थिक वर्षात समान मासिक हस्यात प्रतिमाह अग्रीम स्वरुपात PMPML संस्थेस आदा करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/३०, दि.०९/०४/२०२५ चे पत्र.

१) PMPML संस्थेच्या मागणीनुसार (संदर्भ क्र.२) सन २०२४-२५ या वर्षातील अंदाजित संचलन तूट रक्कम रु.८९४.०२ कोटी ग्राह्य धरली असता पुणे महानगरपालिकेच्या (६०%) स्वामित्व हिश्श्यानुसार र.रु.५३६=४१ कोटी होत असून त्यापैकी सन २०२४-२५ मध्ये संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये अपवादात्मक बाब म्हणून उचल स्वरूपात आदा करण्यात आलेले रक्कम रु. ८४=१५ कोटी (अक्षरी रक्कम रु. चौऱ्याऐंशी कोटी पंधरा लक्ष) समायोजित करून समायोजनानंतर उर्वरित रक्कम रु.४५२=२६ कोटी (अक्षरी रक्कम रु. चारशे बावन्न कोटी सव्वीस लक्ष) पुणे महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात (RE58A101A) '४८ अ' पीएमपीएमएलच्या संचलानमधील तुटीपोटीचा हिस्सा' या अर्थशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीमधून माहे एप्रिल २०२५ पासून प्रतिमहा रक्कम रु.३७=५० कोटी (अक्षरी रक्कम रु. सदोतीस कोटी पन्नास लक्ष) याप्रमाणे १२ समान मासिक हस्यात (माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६) पुणे महानगरपालिकेकडून PMPML संस्थेस आदा करणेस,

२) सदर १२ हस्यांपैकी ११ हस्ते आदा केल्यानंतर उर्वरित १२ वा हसा पुणे महानगरपालिकेच्या मा. मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून पीएमपीएमएलच्या सन २०२४-२५ च्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण झालेनंतर, ताळेबंदाचे लेखापरिक्षणानुसार निश्चित झालेली कमी अधिक रकमेनुसार पीएमपीएमएल संस्थेस आदा करणेस.

विषय क्र.१७३

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील पेठ वानवडी, अे फॉर्म क्र. A/WAN/000171 सन २०२२-२०२३ मधील मिळकतींच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींमुळे वसुलपात्र र.रु.९२,३८,०३६/- वसूल करणे बाबत मा. मुख्य लेखापरीक्षक यांनी जा.क्र.मुलेप/१०७, दि.०९/०४/२०२५ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक – १, सन २०२५ -२६ चा विचारासाठी.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका